जिल्हा
देशोन्नती बुलडाणा / शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०१

# सद्भावना दिनानिमित्त रॅली

कार्यालय प्रतिनिधी/२९ ऑगस्ट

**बुलडाणा** : स्थानिक विदर्भ कला व वाणिज्य महाविद्यालयात सोमवार २६ ऑगस्ट रोजी स्व. राजीव गांधी जयंती निमित्त सद्भावना रॅली काढण्यात आली.

सद्भावना दिन कार्यक्रमाची सुरुवात श्रीशिवाजी महाविद्यालय, चिखलीचे प्राचार्य डॉ.निळकंठ भुसारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.आर म्हळसने रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. हुडेकर तर राजेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका सौ.संगिता पवार या उपस्थित होत्या. प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.डी.हुडेकर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. म्हळसने यांनी समाजातील सुक्ष्म गोष्टींकडे दुर्लक्ष न करण्याचा संदेश दिला. संचलन गजानन कचोरे व आभार अक्षय इंगळे यांनी केले. सद्भावना रॅली विदर्भ महाविद्यालयातुन मार्गस्थ होवून श्रीशिवाजी विद्यालय, संगम चौक, बसस्टॅंड, जांभरुण रोड, लिलावती ब्लड बॅंक, लध्दड हॉस्पीटल मार्गे महाविद्यालयात रॅलीचे विसर्जन करण्यात आले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक कर्मचारी प्रा.सौ.एस.के. पवार, प्रा.पी.डी.हुडेकर, प्रा. एम.टी.जमईवार, प्रा.एल.एफ. शिराळे, आदी उपस्थित होते.